# बाबासाहेब आंबेडकरांचे श्रमीकां विषयींचे विचार व कार्ये

**सद्दामसो हजरतसो पिरजादे**
सलग्नता – शिव–शाहू महाविदयालय, सरूड
विद्यापीठ – शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
पदनाम – सहा.प्राध्यापक,अर्थशास्त्र विभाग

**प्रस्तावना –**

*स्वातंत्र्यपुर्व काळात शेतकरी, कष्टकरी, कामगार वर्गाच्या उत्थानासाठी मुलभूत कार्य केले आहे. विधीमंडळ सदस्य संपादक, राजकीय नेता व बुध्दीमान भारतीय या नात्याने त्यांनी जे चिंतन मांडले व प्रत्यक्ष कृती कार्यक्रम हा श्रमीक वर्गाच्या मुक्तीचा होता. शेतकरी मजूर आणि कष्टकरी यांच्या होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य बाबासाहेब आंबेडकर यांनी केले ते योग्य त्या संधीची वाट पाहत होते व संधीच्या शोधात असताना ब्रिटीश राजवटी मध्ये मंजूर मंत्री पदावर काम करण्याची संधी त्यांना मिळाली व त्यांनी या संधीचे सोने केले. मजूरांचे दिवस पालटले व मजूर–श्रमीकांच्या जिवनात कायमचा महाप्रकाश टाकून गेले. बाबासाहेबांचे सामाजिक राजकीय घटना निर्मीती इ.संबधीचे कार्य मोलाचे आहेच पण त्याही पेक्षा कामगारांसाठी/ श्रमीकांसाठी त्यांनी केलेले कायदे उल्लेखनिय व महत्वपूर्ण आहेत. बाबासाहेबांना कामगार वर्गाबददल त्यांना असलेल्या आपुलकीच्या भावनेचे प्रतिबींबब त्यांच्या जिवनातील काळात दिसून येते.त्याची सविस्तर चर्चा आपण पुढे करू.*

***महत्वाचे शब्द** – श्रमीक, कायदे , विचार , शेतकरी ,वेतन.*

१९३६मध्ये आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली.या जाहीरनाम्यात आंबेडकरांनी कारखान्यातील कामगा–यांच्या व शेतकऱ्यांच्या हिताला अनुसरून कार्यरत राहण्याचे ग्वाही दिली होती. कामगारवर्गाच्या हितासाठी नोकरी,बडतर्फी, पगारवाढ यावर सरकारी नियंत्रण असावे, कामाच्या तासावरील मर्यादा, योग्य वेतन, भरपगारी रजा तसेच बोनस, निर्वाह वेतन या संबंधीचे कायदे करून घेण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची विचार स्वातंत्र्य मजूर पक्षाच्या जाहिरनाम्यातच मांडण्यात आले होते. आजारपण, बेकारी व अपघात प्रकरणी कामगारांना विमा योजना व कामगारांना राहण्यासाठी स्वस्त भाडयाच्या घराचाही आश्वासन आंबेडकरांनी दिले होते.शेतकरी व कामगारांचे राहणीमान सुधारून त्यांना योग्य उत्पन्न व कमाई व्हावी यासाठी त्यांना किमान मिळकतीची हमी देण्याच्या मर्यादा ठरवण्याचा प्रयत्न हा पक्ष करील असा विचारही त्यांनी मांडला.

कामगार व कारागीर यांनी त्यांच्या व्यवसायात प्राविण्य मिळविण्यासाठी व स्वत:ची उत्पादकता वाढवण्यास सहाय्यभूत व्हावा यासाठी व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्याचा प्रयत्न बाबासाहेबांनी केला. आंबेडकर आपल्या भाषणात म्हणायचे संप म्हणजे स्वातंत्र्याच्या हक्काचे दूसरे नाव प्रत्येक मनुष्याला स्वातंत्र्याच्या हक्का इतकेच कामगाराचा संप करण्याचा हक्क पवित्र आहे. संप करण्याचा हक्क नसल्यामुळे कामगारांना संप करण्याबददल शिक्षा करणे ही गोष्ट नितीच्या व कायद्याच्या विरूध्द नाही असे म्हणने पुर्णपणे चुकिचे असल्याचे मत त्यांनी ठामपणे मांडले

कामगार वर्ग एकत्र यावा व त्यांनी स्वत: आपल्या मागण्या पुर्ण करून घेण्यासाठी कामगारांनी संघटन उभारले पाहिजे. यात काही किंतू परंतू तेवढे पुरेसे नाही. तुम्ही राष्ट्रीय उददीष्टासाठी संघटीत झाला पाहिजे. श्रमीक संघटनांनी राजकारणात शिरलेच पाहिजे कारण शासन सत्तेवाचून कामगारांच्या हिताचे संरक्षण करणे अशक्य आहे. संघटनेच्या शक्तीला कायद्याच्या शक्तीची जोड मिळाली पाहिजे आणि त्यासाठी तुम्ही देशाच्या राजकारणात भाग

घेतल्याशिवाय हे घडू शकत नाही. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या तत्वावर अधारलेली नवी पध्दती स्थापन करणे हे तुमचे ध्येय असले पाहिजे.याचा अर्थ समाजाची पुर्नरचना घडवून आणणे हे कामगार वर्गाचे प्राथमिक स्वारूपाचे कर्तव्य आहे. जो पक्ष वर्गहिताच्या व जाणीवेच्या पायावर आधारलेला असेल अशा पक्षामध्ये तुम्ही सामील व्हा. १९४२ रोजी मुंबई आकाशवाणी केल्यावर मजूर मंत्री नात्याने भाषणात ते विचार मांडतात कि देशाला अचूक नेतृत्व कोण देऊ शकतो ? हे नेतृत्व कामगार वर्गच देवू शकतो असे मला वाटते.

**श्रमीकांच्या साठी केलेले कायदे –**

बाबासाहेबांचे विवीध क्षेत्रात मांडलेले विचार मोलाचे आहेतच पण त्यांनी फक्त विचार करूनच न थांबता विचारांना प्रत्यक्ष आमलात आणण्याचा प्रयत्न केला. श्रमीकांच्या कल्याणासाठी त्यांनी विविध कायदे संमत करून घेतले त्याचा आढावा आपणे पुढे घेऊ.

१. बाबाहेबांनी १९५३ साली मुंबई कामगार कल्याण निधी अधीनियम हा कायदा गठीत करण्यात आला.
२. मार्च १९५४ ला कोळसा उत्पादन आणि स्त्री खाणकामगार या दोन्ही बाबींचा विचार मांडून कामगारांचा महागाई भत्ता, नुकसान भरपाई, असमान महगाई भत्यास श्रमीक संघटना जबाबदार ,खाण कामगार वेतन व सवलती मजकुर खात्याचा नोकरवर्ग यावर भरीव काम केले.
३. प्रसुतीच्या काळात विश्रातींची तरतुद रोख मदत १९४५ च्या विधेयकात तरतूद करून स्त्री हित जोपासले.
४. किमान चार आठवडे प्रसुती भत्ता मिळावा तसेच कामगार गैर हरज असताना त्यांना पगारी सुटया मिळाव्या. त्याचबरोबर कायद्याखाली नियमन करण्याचा अधीकार,खाणकामगारांना शॉवर–बाथची योजना आमलात आणली.
५. युध्दकाळात मजूरांना योग्य न्याय मिळावा यासाठी बाबासाहेबांनी कायद्याच्या नोकरीचा लबाद ,मजुर पक्ष व मजूर खाते, स्त्री पक्ष मजूर परीषदेचे महत्व, मजूरांचे बहुरंगी पुढारी, पगारी सुटयांचे वर्गीकरण केले.
६. कामाचे तास कमी करून ते ८ तास केले.
७. महीला कामगारांना वेलफेअर फंड लागू केले.
८. महीला व बालसंरक्षण कायदा, खाणकामगारांना सुविधा, भारतीय फॅक्टरी कायदा आमलात आणला.

कामगारांचा उध्दार होण्यासाठी बाबसाहेबांनी विविध क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे.

- शेतकऱ्यांसाठी किमान वेतनदर असावेत अशी मागणी विधीमंडळास केली.
- १९३७ साली कोकणातील बहूजन कामगारांचे शोषण थांबवण्यासाठी खोती पध्दत नष्ट करण्यासाठी बिल मांडले.
- १९३८ साली कोकणातील औद्योगिक कलह विधेयकानुसार कामगारांचा संप करण्याचा हक्क हिरावून घेतला गेला पण बाबासाहेबांनी संप हा दिवाणी अपराध आहे फौजदारी नाही असे मत मांडून संप करण्याचा कायदेशीर अधीकार मिळवून दिला.
- १९३८ मध्ये सावकारी नियंत्रण विधेकय तयार केले.
- बिडी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी बिडी कामगार संघ स्थापन केला.
- १९४५ ला कामगार कल्याण योजना सादर केली ही योजना लेबर चार्टर म्हणून प्रसिध्द आहे.
- कामगारांना अगोदर भरपगारी रजा मिळत नव्हती १९४४ ला बाबासाहेबांनी भरपागारी रजा विधेयक मंजूर केले.
- १९४२ ते व्हॉइसरॉय मंत्रीमंडळात कामगार मंत्री झाले. हया कारकिर्दीत त्यांनी कामगारांसाठी बरेच कायदे निर्माण केले.
- युध्द साहीत्य निर्माण करणा–या कारखाण्यात एक संयुक्त कामगार नियामक समीती स्थापन केली.
- सेवा योजना कार्यालयाची स्थापना केली.
- कामगारांना कमीत कमी वेतन ठरवण्याची तरतूद असलेले बिल मांडले. व यातुनच किमान वेतन कायदा १९४८ ची निर्मीती झाली.

- औद्योगीक कलह मिटविण्यासाठी समेट घडवून आणणरी यंत्रणा ( लवाद यंत्रणा ) उभारण्याची तरतूद केली.
- १९४३ रोजी त्रिपक्षीय कामगार परीषदेचे बाबासाहेब अध्यक्ष होते.त्यात त्यांनी कामगारांच्या अन्न,वस्त्र,निवारा,शिक्षण सांस्कृतीक गरजा व आरोग्याचे उपाय तसेच कामगारांच्या सामाजीक सुरक्षीततेसाठी उपाय यासाठी ठराव संमत केला. जानेवारी १९४४ ला खाण कामगारांसाठी कोळसा खाण कामगार फंडची स्थापना करणारे विधेयक मांडले.
- ऑगस्ट १९४५ मध्ये औद्योगिक वसाहतीचे नियम व मालकाची जबाबदारी यावर विचार विनीमय करणा—या स्थायी समीतीचे अध्यक्षपद भुषवले. त्यात त्यांनी उद्योगासाठी मौलीक सुचना दिल्या.
- एप्रील १९४६ ला मिका माइन्स लेबर वेलफेअर फंडची स्थापना करण्यासंबंधीचे बिल संमत केले.
- कामगारांचे आर्थीक जीवनमान उंचावण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यात आर्थीक धारेणे स्पष्ट केली.
- स्टेटस ऍण्ड मायनॉरिटीज या ग्रंथामध्ये वेठबिगार कामगारांच्या प्रश्नाला हाथ घालताना बाबासाहेबांनी वेठबिगार हा गुन्हा आहे असे मत मांडले.
- १९४६ बजेट मध्ये आठवडयाचे कामाचे तास ५४ वरून ४८ केले.दिवसाला १० तासा ऐवजी आठ तास काम करण्याचे बिल मांडले.

**मुल्यमापन —**

बाबासाहेबांचे वरील बहुमुल्य योगदान पाहता आज कामगारांची जी सुस्थीती दिसत आहे. त्यात बाबासाहेबांचा निश्चीतच सिंहाचा वाटा आहे असे म्हणावे लागेल. बाबासाहेबांनी विविध कायदे व कायद्यामध्ये योगदान देवून श्रमीकांची होणारी पिळवणूक नक्कीच थांबवली.

आजवर एक बिगारी कामगाराचा दर्जा असलेला मजूर आता सुबध्द नागरिक आणि कर्मचारी वर्गात गेला. त्याला त्याच्या अस्तीत्वाची हमखास ओळख मिळवून बाबासाहेबांनी दिली.याहून मोठे कार्य आणखीन काय असू शकत. सरकारच्या लेखी मजूराच जगणं आता दखलपात्र गोष्ट बनली सरकारला मजुरांच्या समस्यांना अग्रक्रमाने प्राधान्य देणे बंधनकारक बनले आहे. कामगारांच्या नानाविध समस्यांचे निराकरण होण्यासाठी तसेच कामगारांचे स्वत:चे प्रश्न सोडवण्यासाठी कामगारांना हक्काचे मंच उपलब्ध करून दिले. त्यासाठी १९४३ मध्ये श्रमीक संघटना कायद्यामध्ये दुरूस्ती करणारे विधेयक विधीमंडळात मांडले. मुददा असा कि श्रमीक कामगार यांच्यासाठी बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या अमुल्य देणग्या दिल्या आहेत. त्याचा विसर कामगार संघटनांनी कधी पडू देवू नये वर उल्लेख केलेले सर्व नियम सुचना कायदे आजही जसेच्या तसे कार्यान्वीत आहेत.हे सुध्दा ध्यानात ठेवावे महत्वाची गोष्ट म्हणजे भारतातील कामगारांना त्यांचे हक्क मिळवून देण्यामध्ये बाबासाहेबांनी मोलाचे योगदान दिले आहे.

**संदर्भ :—**

१. आपला आदर्श, आपली प्रेरणा — ब्रिजेश सिंह
२. महामानव — धनंजय किर
३. कामगार नेते : बाबासाहेब आंबेडकर — वैभव छाया
४. लोकमत — अजीत सावंत
५. पी.के. जुमल — वर्डप्रेस डॉट कॉम